**ठळक बातम्या**

- वक्फ सुधारणा विधेयक लोकसभेत सादर, धार्मिक स्थळाच्या नियमांत बदल किंवा हस्तक्षेप करण्याचा उद्देश नसल्याचं सरकारचं स्पष्टीकरण

- देशभरातल्या राष्ट्रीय महामार्गावरच्या टोलमध्ये ४ ते ५ टक्क्यांची वाढ

- नौदलाच्या तर्कश या जहाजाने हिंदी महासागरात अडीच हजार किलो अंमली पदार्थ पकडले

**आणि**

- बुलढाणा जिल्ह्यात झालेल्या अपघातात ६ जण ठार तर २६ जण जखमी

**<><><><><>**

केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहारमंत्री किरेन रिजिजू यांनी आज लोकसभेत वक्फ सुधारणा विधेयक सादर केलं. या विधेयकाचं उद्दिष्ट वक्फ मालमत्तेचं व्यवस्थापन आणि प्रशासन यात सुधारणा करणं हे आहे. हे विधेयक केवळ मालमत्ता व्यवस्थापनाशी निगडित असून सरकार कोणत्याही धार्मिक स्थळाच्या नियमांत बदल किंवा हस्तक्षेप करणार नाही, असं ते म्हणाले. याविषयी अधिक माहिती ऐकुया आमच्या प्रतिनिधीकडून…

**------व्हॉइस कास्ट ---**

वक्फ सुधारणा विधेयकावर विचारविनिमय करण्यासाठी स्थापन केलेल्या संयुक्त संसदीय समितीत यावर व्यापक चर्चा झाली आहे, आतापर्यंत कोणत्याही विधेयकावर इतकी चर्चा झालेली नाही, असं रिजिजू म्हणाले…

**होल्ड.. बाईट - किरेन रिजिजू (38 सेकंद)**

विधेयकाला विरोध करणारे देखील त्यातल्या सुधारणांचा अभ्यास केल्यानंतर त्याचं स्वागत करतील, मात्र विरोधक याबाबतीत जनतेची दिशाभूल करत आहेत, असा आरोप त्यांनी केला. वक्फ बोर्डांमध्ये शिया, सुन्नी, बोहरा तसंच मुस्लिम समाजातल्या मागास जमातींचे प्रतिनिधी आणि महिलांचा देखील समावेश असेल अशी माहिती रिजिजू यांनी दिली. सरकार कोणाच्याही धार्मिक भावना दुखावत नसल्याचं ते म्हणाले. संपूर्ण जगातल्या वक्फ मालमत्तेपैकी सर्वाधिक मालमत्ता भारतातल्या वक्फ मंडळांच्या ताब्यात आहे, मात्र असं असूनही आजपर्यंत मुस्लिम समाजातले गरीब लोक शिक्षण, वैद्यकीय सुविधा, रोजगार यांपासून का वंचित राहिले, असा प्रश्न त्यांनी व्यक्त केला. या विधेयकाला धर्म आणि जातीच्या कक्षेतून न पाहता त्याकडे मुस्लिम समाजातल्या गरिबांच्या कल्याणाच्या दृष्टीनं बघावं, असं आवाहन त्यांनी केलं. आपल्या देशात कित्येक वक्फ मालमत्ता पडून आहेत, त्यांचा उपयोग गरीब मुस्लिमांसाठी करता येईल, असं ते म्हणाले. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनीही लोकसभेत विरोधकांच्या प्रश्नांना उत्तर दिलं. केंद्रीय मंत्रिमंडळानं वक्फ सुधारणा विधेयक संमत केल्यानंतर ते संसदेसमोर मांडण्यात आलं होतं त्यानंतर सभागृहाच्या सहमतीनंच ते संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्यात आलं होतं. विरोधी पक्षांचा देखील तसाच आग्रह होता, असं त्यांनी स्पष्ट केलं.

**<><><><><>**

वक्फ सुधारणा विधेयक, संविधान विरोधी असून सरकार त्यावरून जनतेची दिशाभूल करत असल्याचा आरोप काँग्रेसचे गौरव गोगोई यांनी लोकसभेत यावरच्या चर्चेला सुरुवात करताना केला. हे विधेयक आणून सरकारचा संविधानाला कमकुवत करण्याचा, अल्पसंख्यक समाजाला बदनाम करण्याचा आणि भारतीय समाजात दुफळी माजवण्याचा डाव आहे, अशी

टीका त्यांनी केली. या विधेयकातल्या सुधारणांमुळे आणखी समस्या निर्माण होतील, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

वक्फ संशोधन विधेयकाचं राज्य अल्पसंख्यक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान यांनी स्वागत केलं आहे. या जमिनी मुस्लिमांना देण्याचं आवाहन त्यांनी केलं.

**होल्ड बाईट - प्यारे खान**

**<><><><><>**

भारतीय रेल्वेनं महिलांच्या सुरक्षिततेसाठी अनेक उपाययोजना अंमलात आणल्या असून येत्या दीड ते दोन वर्षात रेल्वे स्थानकांमध्ये पुरेसे सीसीटीव्ही कॅमेरे बसवले जातील, त्यासंबंधीचं कार्य वेगानं सुरु आहे, अशी माहिती रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज लोकसभेत दिली. प्रत्येक रेल्वे विभागात, परिमंडळात आणि रेल्वे मंडळात वॉर रूम स्थापन केल्या असून त्यांवर नियमित देखभाल केली जात आहे. रेल्वे संरक्षण दलात एकूण मनुष्यबळापैकी ९ पूर्णांक ४ दशांश टक्के महिला कार्यरत असल्याचं त्यांची सांगितलं.

**<><><><><>**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण म्हणजे देशाचं बौद्धिक पुनर्जागरण आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी एका दैनिकात लिहिलेला लेख प्रधानमंत्र्यांनी सामायिक करताना हे वक्तव्य केलं. नवं शैक्षणिक धोरण शिक्षण आणि नवोन्मेषाच्या माध्यमातून

आत्मनिर्भर आणि जागतिक स्तरावर प्रतिस्पर्धा करु शकणारं राष्ट्र घडवण्याचा मार्ग प्रशस्त बनवत आहे, असंही प्रधानमंत्र्यांनी म्हटलं आहे.

<><><><>

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने देशभरातल्या टोलशुल्कात ४ ते ५ टक्क्यांनी वाढ केली आहे. ही वाढ तात्काळ लागू होणार आहे. हलक्या वाहनांसाठी ५ ते १० रुपये तर जड वाहनांसाठी २० ते २५ रुपयांनी टोल वाढणार आहे. कारसाठीचा मासिक पास आता ९३० वरून ९५० रुपये इतका होणार आहे. हे सुधारित दर देशभरातले राष्ट्रीय महामार्ग तसंच एक्सप्रेस मार्गांना लागू होणार आहेत.

<><><><>

भारतीय नौदलाच्या आयएनएस तर्कश या लढाऊ जहाजाने पश्चिम हिंद महासागरात अडीच हजार किलो अंमली पदार्थ जप्त केले. पश्चिम हिंद महासागरात एक जहाज संशयास्पदरित्या आढळल्याची माहिती भारतीय नौदलाच्या  पी ८ आय विमानानं आयएनएस तर्कशला दिली होती. हे जहाज अमली पदार्थ वाहून नेत असल्याचा संशय होता. त्यामुळे आयएनएस तर्कशने आपला मार्ग संशयित जहाजाच्या दिशेने बदलला. या जहाजाची चौकशी करून ते अडवण्यात आलं. जहाजाची तपासणी केल्यानंतर त्यात अमली पदार्थ सापडले.

<><><><>

भारतीय मानक ब्युरोने विना हॉलमार्क सोनं विक्री करणाऱ्या नंदुरबारमधल्या तीन दुकानांवर छापा टाकला. यात ९०० ग्राम सोनं जप्त करण्यात आलं. स्थानिक पोलिसांच्या मदतीनं ही कारवाई करण्यात आली.

**<><><><>**

बुलढाणा जिल्ह्यात खामगाव शहरालगतच्या शेगाव मार्गावर आज पहाटे तीन वाहनं एकमेकांवर आदळल्यानं झालेल्या अपघातात ६ जण जागीच ठार तर २६ जण जखमी झाले आहेत. खासगी बसला ओव्हरटेक करणाऱ्या  बोलेरो कारला समोरून एसटी बस आणि मागून खासगी बसची धडक बसल्यानं हा अपघात घडला. यात बोलेरोमधल्या ५ आणि एसटी मधल्या एका प्रवाश्याचा मृत्यू झाला. जखमींवर खामगावच्या सामान्य रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

**<><><><>**

धुळे तालुक्यात आनंद खेडा गावामध्ये एका गोठ्याला मध्यरात्री लागलेल्या आगीत म्हशीच्या सात रेडक्यांचा होरपळून मृत्यू झाला, तर दहा म्हशींना गंभीर दुखापत झाली. जिल्हा परिषद सदस्य तसंच जिल्हा पशुसंवर्धन अधिकाऱ्यांनी घटनास्थळाची पाहणी करुन, पंचनामा करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.

**<><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूचा सामना आज गुजरात टायटन्सशी होणार आहे. हा सामना बेंगळुरूच्या एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर संध्याकाळी ७.३० वाजता सुरू होईल.

लखनौ इथं काल रात्री झालेल्या सामन्यात पंजाब किंग्सनं लखनौ सुपर जायंट्स संघाचा ८ गडी राखून पराभव केला. लखनौ सुपर जायंट्स संघानं निर्धारित २० षटकांत ७ गडी गमावून १७१ धावा केल्या. पंजाब किंग्सनं अवघ्या २ गड्यांच्या मोबदल्यात १६ षटकं आणि २ चेंडुत हे आव्हान पार

केलं. गुणतालिकेत पंजाब किंग्ज चार गुणांसह दुसऱ्या स्थानावर पोहोचला आहे, तर लखनौ दोन गुणांसह सहाव्या स्थानावर आहे.

<><><><><>

अर्जेंटिना इथं उद्यापासून सुरू होणाऱ्या ISSF नेमबाजी विश्वचषक स्पर्धेत भारताचे ४३ खेळाडू सहभागी होत आहेत. या पथकाचं नेतृत्व ऑलिंपिक पदक विजेती मनु भाकर करणार आहे. या स्पर्धेचा उद्घाटन समारंभ आज होणार आहे. या स्पर्धेत एअर रायफल, एअर पिस्तुल आणि शॉटगन प्रकार असून त्या ४५ देशांमधले ४०० हून अधिक नेमबाज सहभागी होत आहेत. भारताच्या संघात मनु भाकरसह सौरभ चौधरी, अनिश भानवाला, विजयवीर सिद्धु, ईशा सिंग, ऐश्वर्य प्रताप सिंग तोमर, सिफत कौर समरा, अर्जुन बबुता, पृथ्वीराज तोंडाईमन, अनंतजीत सिंग नरुका, रायझा धिल्लाँ आणि सोनम मस्कर हे प्रमुख खेळाडू आहेत.

<><><><><>

राज्याच्या जवळपास सर्वच भागात आज आणि उद्या अवकाळी पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. काही ठिकाणी वादळी वाऱ्यासह गारपीट होण्याचीही शक्यता आहे. पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, अहिल्यानगर, बीड, धाराशिव आणि लातूर या जिल्ह्यात आज ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. भंडारा, गोंदिया, छत्रपती संभाजीनगर, जालना, धुळे आणि नंदूरबार वगळता राज्यातल्या इतर सर्व जिल्ह्यात आज हवामान विभागानं यलो अलर्ट दिला आहे.

//<><><><><>//